



BVBK-0404570
म. ग्र. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ४५६०.

समाज शिक्षण माला

पुस्तक चव्वेचाळिसावे

# आई शिवाय जलमला

लेखक

नामदेव व्हटकर

अनुक्रम २६८८०
विभाग
क्रमांक २८३०
२५५०
वा.वा.

पहिली आवृत्ति १९५४

BVBK-0404570

किंमत ६ आणे

## प्रास्ताविक—

" आईशिवाय जलमला " हे श्री. नामदेव व्हटकर यानी लिहिलेले पुस्तक आमच्या समाज शिक्षण मालेचे ४४ वे पुस्तक म्हणून वाचकांच्या हाती देताना आम्हाला समाधान वाटते.

आजवरच्या आमच्या पुस्तकापेक्षा हे पुस्तक अगदी वेगळे आहे. तमाशातील हा ' वग ' आहे. संवाद रूपाने लेखकाने येथे निर-निराळ्या प्रसंगाच्या द्वारा ' भूदाना 'ची कल्पना दिलेली आहे. खेड्यातील माणसे आपल्या रोजच्या भाषेत खेळीमेळीने इथे बोलत आहेत. त्यांची ही रांगडी भाषा मोठी मनोवेधक आहे, असे वाचताक्षणीच आपल्या लक्षात येईल.

खटकेबाज संवाद, खेडुत मनाला भुरळ पाडणारे कथानक आणि कानाला गोड वाटणारी गाणी हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. हा ' वग ' मुंबई आकाशवाणीने अगोदरच सादर केला आहे. फार लोकाना तो आवडल्यामुळे आम्ही मुंबई आकाशवाणीच्या सौजन्याने इथे देत आहोत.

श्री. व्हटकर यांच्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

समाज-शिक्षण प्रकाशन
टिळक रोड, पुणे २
दि. २० मे १९५४.

सरोजिनी बाबर
संपादिका
समाज शिक्षण माला, पुणे

—

# आई शिवाय जलमला

## तमाशाचा वग

★

( ढोलकीची आणि तुणतुण्याची पहिली गत होऊन गेल्यानंतर एक श्रीमंत व एक गरीब शेतकरी वाकून मुजरे करीत गाणे गात पुढे येतात. )

दोघे——रामराम घ्यावा
आमुचा रामराम घ्यावा.

एकजण——आमच न्हाण दूर देशी
आलो तुमच्या गावाशी.

दुसरा——न्याय चातुर्याची वस्ती
या गावी हाई अशी ऐकली कीर्ती.

एकजण——आम्हा दोघांचा तंटा लागलेला
दहा वर्स झाली मिटेना झाला.

दोघेजण——म्हणुनिया शेवटी आलोय तुमच्या गावा
तुम्ही शहाणपणान न्याय अम्हाला द्यावा,
रामराम घ्यावा.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

रामराम, गावकरी रामराम.

ढोलक तुणतुणेवाले--रामराम-रामराम-काय हो, कोण तुम्ही ?

गणपति ( गरीब असलेला )--माझ नाव गणपती. आन् ह्येच नाव हाय शिरपती.

ढोलकवाला--वा-वा-वा ! शिरपतराव, गनपतराव, मग आमच्या गावात कशी काय पायधुळ झाडली तुम्ही ?

शिरपती--अवो पावन आताच सांगितल न्हाईका तुमाला, का धा वर्स झाली, आमचा तंटा लागल्याला हाय, त्यो तुटना, तुमच्या गावात चतुर शान लोक हायेत अस आमास्नी कळल, म्हणून मुद्दाम आमी आमचा तंटा तोडून न्याय करायसाठी या गावाला आलो--

तुणतुणेवाला--शाबास ! शाबास ! या गावातला शाना मनुक्ष मीच हाय. आनीक माझ्या खालोखाल ह्यो ढोलक्या. आमची तुमची गाठ पडली, आता तुमचा तंटा तुटणार-

गणपत--हं ! मग सांगू तुम्हाला. मजी काय झाल बघा--

तुणतुणेवाला--थांबा थांबा ! आम्हाला, काय सांगू नका--

शिरपत--अहो मग न्याय कसा देणार ?

ढोलक्या--अहो पावन, न्याय काय आमच्या खिशात ठेवलाय का काय आमी ? मागितला की आपला दिला काढून ना तंबाखुवानी--

गणपत—अवो, तुमच्या गावात शानेसुर्ते लोक ऱ्हात्यात अस कळल आम्हाला, म्हणून आलो-

तुणतुणेवाला—म्हणून आला तुमी ? चांगल केल. न्यायबी तुमाला मिळल. पर तंटा आमाला सांगू नका.

शिरपती—आत्ता ! अवो, मग तुमी न्याय करणार कशाचा ? तुमी शान हाय म्हंता--

ढोलक्या—अवो शान हाय, मजी जित तुमचा तंटा तुटल त्याच जागेला आम्ही तुमाला नेमक नेऊन पोचवू. अवो, एवढ करायला सुद्धा काय कमी शहानपन लागत ?

तुणतुणेवाला—अवो, धा वर्स ज्यो तंटा तुटला नाही, त्यो तासा दोन तासात तुटणारी जागा आमी दाखवणार, मजी आम्ही केवढ मोठ्ठ शान हाय—

गणपत—( हात जोडून ) व्हय बाबानू व्हय ! तुमी शान, मोठ्ठ शान, पन अशी जागा हाय कुठ ?

ढोलक्या—कुठ ? नदीकाठी मठ !

( ढोलक वाजवीत हसतो. )

श्रीपती—अवो, काय तुमी आमाला खुळबिळ बनीवता का काय ? ‘ नदीकाठी मठ ’ मजी काय ?

तुणतुणेवाला—अवो, खरच नुसता मठ न्हव—

नदीकाठी घाट
घाटावरती मठ
मठात सन्यासी एक मोठ
सार तिथच तुटती तंट

त्याच मठाची आम्ही दावतो
—समद्याना वाट
म्हणून आमीच शान मोट
हो दाजी दाजी र जी जी

ढोलकेवाला—अवो, आमच्या गावाच्या बाजून नदी वहाती. नदीच्या काठावर घाट हाय. घाटावर मठ हाय. त्या मठात योक संन्यासी ऱ्हातो. त्यो तंट तोडतो. कोण कोण म्हंत्यात त्यो संन्यासी बेलेलबी शिकल्याला हाय पर संन्यासी का झाला कुनाला ठाव! तवा त्येच्या मठाची वाट आमी तुमाला दावतो. मग खर मोठ नी शान आमीच ऱ्हाई का?

गणपत—बर बाबा तुमी मोट. पर जिथ आमचा तंटा तुटल तेवढी वाट आमाला दावा—

तुणतुणेवाला—(गणपतच्या दंडाला धरून) चला चला.—

ढोलकवाला—(श्रीपतच्या दंडाला धरून) चला चला—

(तिथच स्टेजवर थोडा वेळ गोल फिरतात. शेवटी)—

तुणतुणेवाला—(हाक मारीत) अवो संन्यासी म्हाराज!— अवो म्हाराज!

ढोलकवाला—याव भाईर याव म्हाराज—(दाढी कुबडीवाला संन्यासी बाहेर म्हणजे पुढे येतो.)

संन्यासी—जय् भगवन्! जय भगवन्! बोला, कोण आल आहे? काय तंटा आहे?—लवकर बोला.

ढोलक तुणतुणवाले—ए गणपत, शिरपत, बोला की— आर बोला बोला—

गणपत--ठीक आहे. म्हाराज आमचा झगडा सांगतो. ऐका—

ह्यो माझा हाई थोरला भाऊराया.
बाप एक आणि दोघीजणी आया.
आमच्या बापाला दोघीजणी जाया.
दोघींची पोर आम्ही हूतो एका ठाया.
वाड्यावाणी आम्हाला घर हाई रहाया.
पर थोरला भाऊ माझा समद् उठला खाया.
त्या इस्टेटीवर मला हक्क देइना.

तुम्ही याला समजून सांगा जरा ऐकना—

संन्यासी--अस्स! काय रे थोरल्या भावा, काय तुझ नाव?

श्रीपती--जी! माझ माझ शिरपती--

संन्यासी--श्रीपती, काय रे, ही कुबडी बघितलीस? ही ही हाणीन टाळक्यात!...तुम्ही दोघे भाऊ ना? का देत नाहीस वाटणी याला?

श्रीपती--म्हाराज!...म्हाराज! तुम्ही ह्येंच म्हणण ऐकल, वाईच माझ तरी ऐका—

संन्यासी--बोल-काय म्हणण तुझ?

श्रीपती--आमच्या दोघांच्या दोन आया हे खर. मी थोरलीचा मुलगा. ह्यो धाकटीचा मुलगा. पर माझ्या बाचा धाकटीवरच लई जीव जडला. आम्ही दोघबी त्या वक्ताला ल्हान हुतो. आमच्या बापान आता माझ्या धाकट्या आईला

आणि तिच्या मुलाला म्हणजे ह्या गणपतलाच सगळी इस्टेट दिऊन टाकली, म्हणून माझ्या आईच्या वडलाला भीती वाटली. त्यो माझ्या बापाकड आला आणि म्हणाला, 'तू माझ्या लेकीला आणि तिच्या लेकाला काय ठेवणार हाईस का न्हाई ?' माझा बाप इर्षेबाज आन् रागीट हुता. त्येन रागाच्या भरात सबंध तीस एकर जमीन आणि घर माझ्याच नावावर करून टाकल ! ही सगळी मालमत्ता माझ्या बाबाच्याच कष्टाची हाय. आता कायद्यापरमान ह्येला जर मिळत असली तर सगळी जमीन तुम्ही दिली तरी माझी हरकत न्हाई.

(श्रीपतीच हे सगळ बोलण चालू असताना दुसऱ्या कोपऱ्यात येऊन एक दुसराच तरुण संन्यासी उभा आहे. तो हे सर्व बोलण शांतपणे ऐकतो आहे. )

संन्यासी—असं म्हणतोस ? बर, ही सर्व इस्टेट तुझ्या बापाची वडिलार्जित होती की त्यान स्वतःन मिळवलेली ?

श्रीपती--माझ्या वडलान आपल्या हयातीत ती मिळीवल्याली हाय--

संन्यासी--मग–मग न्याय देतो तो ऐका. कायद्याप्रमाण कुणीही गृहस्थान स्वतःन मिळवलेली मालमत्ता कुणालाही देता येते. गणपत, तुझ्या वडिलान स्वतःच मिळवलेली इस्टेट जर याला लिहून दिली असेल, तर तुला त्यातल काहीही मिळू शकत नाही.

गणपत—पर, पर मीही माझ्या बापाचा मुलगा न्हाई काय ?

तरुण संन्यासी--( एकदम पुढ येत ) होय. तुलासुद्धा त्यातली जमीन मिळाली पाहिजे—

संन्यासी--( रागाने ) कोण ? कोण बोलल मध्येच ? तू ? कोण तू ? आज पंधरा वर्षं मी या मठात आहे. मी दिलेल्या निर्णयाला कुणाला कधीही बोट लावता आलेल नाही. आणि आज तू मध्येच बोलणारा कोण ? कुठून आलास ? नाव काय तुझ ?

ढोलकवाला--तुणतुण्या-ह्यो मधीच कोण आला र ?

तुणतुणेवाला—आर दम ! म्हाराज आता काय करत्यात कुणाला ठाव--

तरुण संन्यासी—माझ नाव ? माझ नाव विनू संन्यासी. मी देशभर तीर्थयात्रेला निघालो आहे. आताच या मठात आलो आहे.

संन्यासी—पोरा, फारच कोवळ्या वयात सन्यास घेतलास ! बर घेतलास तो घेतलास, पण लहानानी मोठ्यांच्या समोर बडबड करू नये. इथ कुणाला माहीत नसेल. पण मी एल्एल्. बी. झाल्यानंतर दहा वर्षं वकिली केली. आणि नंतर माझ्या आयुष्यात अशी एक घटना घडली की मी घरदार सोडून बाहेर पडलो तो इथ संन्यासी होऊन राहिलो. मी दिलेला न्याय, कोर्ट दरबारात नेऊन जोखून वजन करून पहा. तो कच्चा पडायचा नाही. म्हणून पोरा, तू लहान तोंडी मोठा घास घेऊ नकोस. यातल्या या धाकट्या भावाला त्या इस्टेटीतली पै मिळायची नाही !

तरुण संन्यासी--( शांतपणे ) नाही ? का नाही ? ती मिळाली पाहिजे--

संन्यासी—मिळाली पाहिजे ? मग कशी ती सांग-

तरुण संन्यासी--कशी ? सांगू ? ऐका-

[ तो तरुण संन्यासी पुढे येतो. तो आता पुढे काही बोलणार इतक्यात पडद्यामागून पुढे येत एक भारी वस्त्रातली स्त्री आणि कुणा राजाचा प्रधान भासेल असा मनुष्य खालील गाणे गात पुढे येतात. सुरते उभ्या राहिलेल्या जागेवरूनच त्या गाण्याला ‘ जी जी ’ देतात. हे गाणे सुरू होताच दोघेही संन्यासी मागे वळून पहात रहातात. तसेच ते दोन्ही शेतकरीही. ]

स्त्री--प्रधानाची बायको--

धावा लौकर कुणीतरी धावा
प्रश्न सोडवा
आम्हाला वाचवा । वाचवा । १

प्रधान--फिरली दैवगती ही कशी
पडलो आम्ही फशी
गळा आली फाशी । अहो फाशी । २

कुणि हायका इथ बुद्धिमान
वाचवा अमुचा प्राण
पुढे होऊन । होऊन । ३

प्रधानाची बायको--पडली काळाची विपरीत उडी
पालटली घडी
फिरतो देशोधडी । देशोधडी ।

संन्यासी—थांबा ! बाई थांबा ! काय झाल काय रडायला ? तुम्हाला एवढ कसल संक.ट आल ?

प्र. बायको--संकट ! भारी संकट आलय ! म्हणून तर गावोगाव वणवण भटकत शेवटी या जागी–इथ–आलो आम्ही.

संन्यासी--पण काय संकट पडल ते तरी सांगा.

प्रधान--संकट ! मोठ विपरित कोड पडलय हो. आत्ता फक्त आठ दिवस उरल्यात. आठ दिवसात ते जर नाही सुटल तर—

प्र. बायको—तर–तर ( रडत ) माझ्या कपाळीच कुंकू-- ( रडू लागते ).

तरुण संन्यासी—बाई, तुम्हाला कसल तरी खरच भयंकर संकट पडलेल दिसत ! काय संकट आहे तुम्ही सांगा. श्रीपत, गणपत, तुम्ही जरा थांबा–बोला बाई तुमच्या पुढ काय प्रश्न पडला आहे ? सांगा—

संन्यासी—ए पोरा, तू मध्ये लुडबुड करू नको. कठिण काम पोरासोराच्यान होत नाहीत. सांगा, तुम्ही कुणीतरी सरदार दरकार दिसता. तुम्ही कोण ? कुठले ? तुम्हाला काय संकट पडल ? बोला. आधी तुम्ही बोला.

प्रधान—महाराज, सांगतो ऐका. तुम्हाला ऐकून माहीत असेलच की, येथून शंभर कोस दूर या राज्याची राजधानी आहे. राजधानीत हल्ली राणी भारती गादीवर बसलेली आहे. मी त्या राणीचा मुख्य प्रधान. जवळ जवळ तीन महिने झाले. एकदा दरबार भरला होता; आणि दरबारात राणी म्हणाली, 'प्रधानजी, आज मी तुम्हाला एक प्रश्न विचारणार आहे. तुम्ही आमचे प्रधान. तुम्ही त्या प्रश्नाच उत्तर दिलच पाहिजे.' मी राणी सरकाराना म्हटल, 'महाराणी सरकार, काय प्रश्न आहे तो विचारावा.' महाराणीसाहेब म्हणाल्या, 'प्रधानजी, या जगात आईशिवाय कोण जन्माला आल ते सांगा!—' हा प्रश्न ऐकताच सगळा दरबार विचारात पडला. मलाही त्या प्रश्नाच उत्तर देता आल नाही. शेवटी महाराणीसाहेब म्हणाल्या, 'प्रधानजी, तुम्हाला तीन महिन्यांची मुदत देते. एवढ्या मुदतीत तुम्ही जर या प्रश्नाच उत्तर मला दिल नाही–तर तुम्हाला फाशी देण्यात येईल.

आणि–आणि संन्यासी महाराज, मी दरबारातून निघून घरी आलो. दरबारात घडलेली हकीकत या माझ्या बायकोला सांगताच ती रडू लागली. आणि नंतर आम्ही ठरवल की तीन महिन्यांची मुदत आहे. या तीन महिन्यात सबंध राज्य-भर हिंडून या प्रश्नाच उत्तर कुणी देईल काय ते पहाव. नाहीतर शेवटी फाशी जायाच नशिबाला आलेलच आहे! आणि आम्ही वाड्यातून बाहेर पडलो. महाराज, मुदत आता संपत आली आहे. तीन महिने संपायला फक्त आठ दिवस

राहिले आहेत. जरी आज या प्रश्नाच उत्तर मिळाल तरी राजधानीला जाईपर्यंत सात दिवस निघून जातील. म्हणजे आज शेवटचा दिवस. आज उत्तर नाही मिळाल तर इथूनच आम्ही परत निघणार आणि महाराणीला म्हणणार, 'आम्हाला उत्तर मिळत नाही, द्या आम्हाला फाशी'–तेव्हा महाराज, या जगात आईशिवाय कोण जन्मला एवढ आपणाला माहीत असल्यास सांगा. आम्ही तुम्हाकड मोठ्या आशेन आलो— सांगा, संन्यासीमहाराज एवढ आम्हाला शोधून सांगा—

संन्यासी––( खोल विचारात पडून ) आईशिवाय कोण जन्मला ?––

तुणतुणेवाला—आईशिवाय जलमला ? कोण बर ?––

ढोलकवाला—आईशिवाय जलम ? छे छे छे ! अस कधीच होणार नाही. हुईल का सांगा ? शिरपतराव, गनपतराव—

गणपत––आईशिवाय जलम ?

श्रीपती—न्हाई न्हाई !—

प्र. बायको—बोला. साधुमहाराज, आईशिवाय कोण जलमला तेवढ सांगा—तुम्हापुढ पदर पसरते. माझ्या नवऱ्याला वाचवा–माझ कुंकू टिकवा–[प्रधान आशेने संन्याशाकडे पहात रहातो. सारीच संन्याशाकडे आशाळभूताप्रमाणे पहात रहातात. तरुण संन्यासी मात्र माग उभा आहे. ]

संन्यासी-–( घोर विचारातून एकदम जागा झाल्यागत कुबडी उंचावून ) छे ! शक्य नाही. हे शक्य नाही. आई-

शिवाय-मातेशिवाय-जन्म नाही. आईशिवाय कुणीच जन्मला नाही. हा प्रश्नच चुकीचा आहे—

प्रधान--महाराज, उत्तर-उत्तर सांगा. आईशिवाय कोण जन्मला ?—

संन्यासी--( कुबडी खाली करीत ) नाही. आईशिवाय कुणीच जन्मला नाही !

प्र. बायको—( माग सरत ) प्राणनाथा, नाही ना उत्तर मिळत ?--चला. संपल आपल आयुष्य ! ( डोळ्याला पदर लावून ) तुम्ही फाशी गेल्यावर मी एक क्षणभर जीव ठेवणार नाही—

प्रधान--चल. आता वेळ लावण्यात अर्थ नाही. राजधानीकडे आजच्या आज निघाल पाहिजे. बाहेर झाडाना घोडी बांधली आहेत. घोडी वेगान सोडून आम्हाला राजधानीत शेवटची निरवानिरव केली पाहिजे—( प्रधानाची बायको रडत आणि प्रधान उसासे टाकीत जायला निघतात. रंगभूमीच्या अगदी शेवटी जेव्हा ती जातात, तेव्हा तरुण संन्यासी एकदम मोठ्याने ओरडतो-- )

तरुण संन्यासी--थांबा. प्रधानजी थांबा. तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी देतो. ( सारे एकदम तरुण संन्याशाकडे पहातात. प्रधान, प्रधानाची बायको एकदम मागे फिरतात. )

प्र० बायको--तुम्ही देता उत्तर ? सांगा ! आईशिवाय कोण जन्माला आल ? ( तरुण संन्याशी सावकाश रंगभूमीवर पुढ येऊन उभा रहातो. त्याचा शब्द ऐकायला सारेजण उत्सुक आहेत. )

प्रधान—बोला. महाराज तुम्ही बोला—

त० संन्यासी—( सावकाश ) प्रधानजी, तुम्हाला हा प्रश्न कुणी विचारला? महाराणीन? मी देईन या प्रश्नाच उत्तर—

संन्यासी—( एकदम तरुण संन्याशावर धावून जात ) चूप!—ए पोरट्या, तुला काय कळणार यातल? कारणाशिवाय कार्य नाही. बीजाशिवाय झाड नाही. स्थानाशिवाय स्थिति नाही. माते शिवाय जन्म नाही. आईशिवाय कसा कोण जन्मेल?

त० संन्याशी—प्रधानजी, मी देईन या प्रश्नाच उत्तर—

संन्याशी--शक्य नाही! शक्य नाही!!

त० संन्याशी—( संन्याशाकडे वळून ) आणि उत्तर दिल तर?—

संन्याशी--जन्मभर दास होईन तुझा--उत्तर देण अशक्य आहे तुला—

त० संन्याशी--माझ्याजवळ या प्रश्नाच उत्तर आहे.

प्र० बायको—सांगा! सांगा मग ते लवकर.

प्रधान—सांगा महाराज, सांगा उत्तर.

त० संन्याशी—प्रधानजी, मी या प्रश्नाच उत्तर देईन. पण इथ नाही. ज्यानी तुम्हाला हा प्रश्न विचारला त्यांच्याच समोर मी या प्रश्नाच उत्तर देईन--

प्रधान—बर! तरी ठीक आहे. चला. तुम्ही राजधानीला दरबारात चला—

त० संन्याशी—ठीक आहे चला—( संन्याशाला ) तुम्हाला उत्तर ऐकायच असेल, तर चला तुम्ही राणीच्या दरबारात !

संन्यासी--ठीक आहे. तयारी आहे माझी--

तुणतुणेवाला--ए ढोलक्या, चल ! आर, आईशिवाय कोन जलमला ते ऐकायला आपुनबी जायाच—

गणपत--आनी आम्हीबी येतो चला--

सोडवाया अवघड कोडे
लहान संन्यासी निघाला पुढे
लोक गावातील होऊनी सडे
चालले थोडे र र
अहो रामा हो जी जी जी १

सन्यासी म्हाराज़ बडे
क्रोध हुर्द्यांत तयांचा चढे
कुबडी आपटीतच पाऊल पडे
कफनी अडे र र
शेतकरी होत क्षणभर खडे
अहो रामा— २

ज्यांचे सुटले नाही झगडे
तेही चालले दरबाराकडे
होऊनी वेडे र र
अहो रामा-- ३

प्रधानाने सोडले घोडे
पायी चालला नवल हे घडे
बायको मुळमुळु रडे र र
ऊर धडधडे
अहो रामा-- ४

( पुढे लहान संन्यासी, मागे संन्यासी, प्रधान, त्याची बायको, शेतकरी आणि शेवटी तुणतुणे व ढोलकवाला असे. रंगभूमीवर गोल फिरतात. आणि शेवटी आत जातात. थोड्याशा चालण्याच्या लईत ढोलक तुणतुण वाजू लागते. आतून गाणे सुरू होताच समोरचा पडदा पडतो. आणि खालील गाणे पडद्यामधून येते )

सोडला सर्वांनी मठ हं हं हं ऐका, हे रामा दाजी
दिनरात चालले वाट ,, ,, ,,
गेले दिवस निघुनी आठ ,, ,, ,,
आले राजधानीला नीट ,, ,, ,,
दरबारात गेले थेट ,, ,, ,,
सिंहासन बघती गजघाट
राणीचा थाट जी जी जी.

( पडदा उघडताच समोर मध्यावर भारताच्या आकाराचे केलेले सिंहासन दिसते. आणि त्यावर महाराणी भारती बसलेली दिसते. प्रथम प्रधान आणि मागोमाग तरुण संन्यासी आणि सर्वजण येऊन आदबीने तिला मुजरे घालून काहीसे बाजूला उभे रहातात. )

महाराणी भारती—कोण ? प्रधानजी ? तुम्हाला दिलेली तीन महीन्यांची मुदत आज संपलेली आहे, हे ध्यानात आहे तुमच्या ?

प्रधान—होय महाराणीसाहेब आणि म्हणूनच रात्रंदिवस वाटचाल करीत आजच्या तारखेला आपणापुढे दाखल झालो.

भारती—मग ? सांपडल उत्तर माझ्या प्रश्नाच ?

प्रधान—देवी, उत्तर अद्याप मी ऐकल नाही. पण उत्तर देणारा तरी मी आपणापुढे आणला आहे.

भारती--तेवढ झाल तरी तुम्ही सुटाल ! आईशिवाय कोण जन्मला, याच उत्तर कोण देणार आहे ?

त. संन्यासी--( थोड पुढ येऊन ) महाराणीसाहेब, या प्रश्नांच उत्तर मी आपणाला देईन !

भारती—( किंचित हसून ) अं ! या प्रश्नाच उत्तर देशील तू ? नाव काय तुझ ?

त. संन्यासी---माझ नाव विनू संन्यासी--

भारती--विनू, हे पहा, या पश्नाच उत्तर देता आल नाही, तर प्रधानाऐवजी तुला फाशी जावे लागेल, याची कल्पना आहे तुला ?

त. संन्यासी--ठीक आहे. मला अट मान्य आहे !

भारती---आणि हा दुसरा संन्यासी कोण ?

संन्यासी--महाराणी सरकार, आपल्या या प्रश्नाला उत्तर नाही. हा कोवळा पोर संन्यासी झाला; आणि उत्तर देतो म्हणतो. तो कसा उत्तर देतो ते पहाण्यासाठी मी आलो आहे.

भारती—या प्रश्नाला उत्तर नाही ?

संन्यासी--त्रिवार नाही !

भारती--का नाही ?

संन्यासी--मी यापूर्वीच सांगितल आहे. कारणाशिवाय कार्य नाही, त्याच प्रमाण मातेशिवाय जन्म नाही.

भारती--विनू, यावर तुझ म्हणण काय ?

त. संन्यासी—देवीजी, आपली इच्छा असेल तर याच संन्यासी महाराजाकडून मी या प्रश्नाच उत्तर वदवून घेतो.

संन्यासी—ठीक आहे. वचन दिल आहेच की, तू या प्रश्नाच उत्तर दिल्यास मी तुझा दास होईन ! महाराणी सरकाराना ते उत्तर पटल, तर तू सांगशील ती आज्ञा मी ऐकेन !

त. संन्यासी—ठीक आहे. पण महाराणीसाहेब, मी उत्तर न दिल्यास तुम्ही मला फाशीची अट घातलीत ! त्याचप्रमाणे माझीही अट आहे.

भारती—बोल ! काय अट आहे ? विनू संन्यासी, तुझी अट कोणती ?

त. संन्यासी—महाराणीजी, जर आईशिवाय जन्मलेला माणूस मी दाखविला तर त्याला तुम्ही आई दिली पाहिजे.

संन्यासी—महाराणीसाहेब, ही अट तुम्ही जरूर स्वीकारा. कारण आईशिवाय, जन्माला आलेला प्राणीच मिळायचा नाही.

भारती—ठीक आहे. ( विचार करीत ) मी या प्रदेशाची राणी आहे. म्हणजेच माझ्या प्रजेची माता आहे. ज्याला आई

नाही त्याची मी स्वतः आई होईन. ठीक? विनू संन्यासी, तू बोलल्याप्रमाणे होऊं द्या तुमचे सवालजबाब—

त. संन्यासी—संन्यासी महाराज, मी पहिला प्रश्न आपणाला विचारतो.

ऐका—

तुम्ही जोगी योगी मुनी
सांगा मनी पुरत समजुनी
कुठ कोणत्या काळी तुम्हाला
जन्म दिला हो कुणी ?

सुरते— हो हो हो ऐका
लक्ष द्याव बर का
हो जी जी जी

तुणतुणेवाला—( ढोलकवाल्यास ) काय तरी साधा सवाल केला !

ढोलकवाला—घ्या ! खुळ्यासारख काय तरी—

संन्यासी—एवढच ? आज साठ वर्षांपूर्वी एका दूरच्या खेडेगावात माझ्या आईच्या पोटी माझा जन्म झाला. तिच नाव भागिरथीबाई—

तरुण संन्यासी—म्हणजे आज साठवर्षांपूर्वी भागीरथीबाईच्या पोटी तुम्ही जन्माला आला. भागिरथीबाई ही तुमची आई अस तुमच म्हणण ?

संन्यासी—होय बरोबर आहे.

त. संन्यासी—वर तुमची आई भागिरथीबाई ही कुणाच्या पोटी जन्माला आली ?

संन्यासी—ती तिच्या आईच्या पोटी जन्माला आली. म्हणजे माझ्या आजीच्या पोटी—

तरुण संन्यासी—हो हो. म्हणजे तुमची आई ही तुमच्या आजीची मुलगी. आणि त्या मुलीच्या पोटी तुम्ही जन्माला आला—मान्य आहे ?

संन्यासी—हो मान्य आहे.

तरुण संन्यासी—ऐका मंडळी, हे एका मुलीच्या पोटी जन्माला आले. ती मुलगी मोठी झाली. फार तर मोठी झालेली मुलगी—

गणपत—शिरपत दादा खरच की ! आपुनसुद्धा पोरीच्या पोटी जलमाला आलो.

श्रीपती—व्हय की र—

त. संन्यासी—बर महाराज, तुमची आजी सुद्धा कुणाच्या पोटी जन्माला आली होती, की ती मुळातच आई होती ?

संन्यासी—अस कस असेल ? ती सुद्धा तिच्या आईची मुलगी. तिची सुद्धा आई तिच्या आईची मुलगी.

त. संन्यासी—म्हणजे ? अरे ! या साऱ्या पोरीच का ? आणि तुम्ही सारी पोरीची पोर ! मग या सर्व पोरी पोरांची, मुला-मुलींची शेवटची आई कोण ?

तीही आणि जर माणूसच असेल तर तीही कुठून जन्मली ?

तुणतुणेवाला--खरच की र ढोलक्या ! आपुन सारी पोरीची पोर !

तरुण संन्यासी--हो हो ! पोरींची पोर ! !

तुम्हाला माहित नाही रे
तुम्ही तर पोरींची पोरे
आई होण्याची पात्रता
कुणाला ? कोण खरोखर माता
अपुली खरी कोण आई
मनातच शोधुन बघ भाई
हुडका अजून पुरतेपणी
तुम्हाला जन्म दिला हो कुणी
( सुरते— बोल हाई साधा
लक्ष द्याव दादा
हो जी जी जी )

श्रीपती—( आश्चर्याने पुढ येत ) अहो म्हाराज, खरच, आमाला पटल बघा. आम्ही समदी पोरींची पोर ! हे आम्हाला पटल बघा. पर मग आई कोण ?

त. संन्यासी—थांबा, प्रश्नाच उत्तर जवळ आल आहे. आमची आई कोण हे ठरवण्यापूर्वी संन्यासीमहाराजाना मला अजून एक प्रश्न विचारला पाहिजे. महाराज, जन्म होतो म्हणजे काय होत ?

संन्यासी—( विचारात गोंधळून ) शरीर निर्माण-अं-अं-शरीर निर्माण होत !

त. संन्यासी—बर ठीक आहे. जन्म व्हायचा म्हणजे शरीर निर्माण व्हायच. आता—

ऐका—  आईची आई आईची आई
असं शेवटी जाऊनी पाही

( ढोलक तुणतुण्याची साथ चालू असतानाच ,)

शेवटी कुणी तरी एक पुरुष आणि एक स्त्री निर्माण झाली असली पाहिजे ! खर ना ?

संन्यासी—हे खर, पण ते तरी मग कुठून जन्माला आले हे सांगा ना ?

त. संन्यासी—सांगतो. तेच सांगतो आता. ती स्त्री आणि पुरुष—

हवा तेज आणि पाणी माती
तिथुन जन्मली पुरुष प्रकृति

( वाद्ये चालूच )

कळल, संन्यासी महाराज ? हवा, तेज, पाणी या मातीत मिसळले आणि त्याच्या संयोगान, मिश्रणान, पहिले स्त्रीपुरुष निर्माण झाले. त्यांचा जन्म झाला. बर याही पुढे तुम्हाला विचारतो. जन्म झाल्यानंतर आपणाला मिळालेले शरीर टिकत कशान ?

तुणतुणेवाला—भाकरी खाऊन.

त. संन्यासी—भाकरी येते कुठून—

ढोलक्या—ताटातन-( हसतो )

त. संन्यासी—ताटात येते कुठून ?—

तुणतुणेवाला—पीठ मळून भाकरी भाजली की मग ताटात येती—

तरुण सन्यासी—पीठ कशाच ?

गणपत—जवारीच, बाजरीच—

तरुण संन्यासी—बाजरी कुठ होते ? ज्वारी कशातून होते ?—

श्रीपती—थाटावर कणसात—

तरुण संन्यासी—आणि ते थाट कुठून येत ?—

प्रधान—मातीतून—मातीतून

तरुण संन्यासी—म्हणजेच विचार करा. आपण आईच बाळ असताना जस दूध पिऊन जगतो. तस आपण पोरीची पोर जगतो कशावर—कळल—?

ज्या अन्नावर शरीर जगते
तेही मातीतून वरती येते—( वाद्य चालू )

गणपत—खर हाय ! खर हाय ! !

तरुण सं०—आणि संन्यासी महाराज, हे जन्मलेल शरीर संपत—म्हणजे आपणाला मरण येत—तेव्हा ते शरीर कुठ जात ?—

माती असशी मातीत मिळशी
गोष्ट उमजुनी घ्यावी मनाशी. ( वाद्य चालू )

म्हणजेच आपण सारे मातीतून आलो. मातीत मूळ जन्मतो आणि शेवटी मातीतच जायच आहे. आणि म्हणून

अनुक्रम २५८०८
...५०..८०
२५३०
९.२५

माती आमुची आई, जमीन अमुची आई
तिच्याच उदरी आम्हि जन्मलो तीच आमुची माई

( सुरते— हो हो हो दाजी
गोष्ट ऐका ताजी
हो हो जी जी जी )

—तेव्हा जमीन हीच तुमची, माझी सर्वांची आई. पटत का हे संन्यासी महाराज ?—

संन्यासी—होय-होय-पटल तुमच म्हणण मला.

तरुण सं०—माझ म्हणण बरोबर आहे महाराणी साहेब ?—

भारती—( गंभीरपणे ) हो, तुझ म्हणण बरोबर आहे विनू संन्यासी !—

तरुण सं०—बरोबर आहे ना ? जमीन हीच आमची खरी आई. आणि मग—ज्याना जमीन नाही. थोडीही जमीन स्वतःची नसताना जे या जगात जन्मले, ते आईशिवाय जन्मले नाहीत काय ? देवी भारती, खुद्द तुमच्या राज्यात लाखो-लाखो लोक जमिनीशिवाय म्हणजे आई शिवाय जन्मलेले आहेत ! लाखो-लाखो—!

भारती—( एकदम सिंहासनावरून उठून ) होय ! होय. विनू संन्यासी ! तुझ उत्तर पटल मला.

तरुण सं०—पटल ! ( एकदम महाराणी भारती पुढे गुढघे टेकून ) मग देवी, तुम्ही आधीच वचन दिल्याप्रमाणे जे आईशिवाय जन्मले त्याना आई द्या ! द्या, आई द्या—!

भारती--(विचार करीत पुढ येत) होय. आता ती जबाबदारी माझ्यावर आली. विनू संन्यासी--जा, सबंध राज्यभर फीर. मी महाराणी भारती. या भारताच्या प्रजेला, गावागावात जाऊन सांग की भारतीची आज्ञा आहे. तुमच्या गावात जमीन ही आई ज्याला नाही, त्याला देता येईल त्यान द्यावी--मी भारती सर्वांना आई द्यायला वचनबद्ध आहे. सर्वांना सांग की या तुमच्या भारती मातेला या वचनातून सोडवण हेच तिच मातृऋण फेडण. ज्याच्याजवळ देण्यासारखी जमीन आहे त्यान ज्याला ती नाही त्याच्यासाठी द्यावी. हे माझी आण घालून सांग. विनू संन्यासी ऊठ--

(तरुण संन्यासी उठतो तोच संन्यासी त्याच्याजवळ जाऊन हात जोडून उभा रहातो. आणि--)

संन्यासी--मी तुम्ही सांगाल ते ऐकायच कबूल केल आहे. विनू संन्यासी-मला आज्ञा द्यावी--

तरुण संन्यासी--नाही. महाराज तुम्ही वडील अहात ! भारती देवीची आज्ञा पाळण्यात आपण मला मदत करा. एवढीच आपणाला विनंती--आणि पहिली मदत म्हणून या गणपत शेतकऱ्याचा निर्णय पुन्हा जाहीर करा--

संन्यासी--(श्रीपत गणपतकडे पहात) होय. या पूर्वी दिलेला न्याय केवळ कायद्याच्या ज्ञानावर आधारलेला होता. पण अता मला कळल की कायदा हा सुद्धा मनुष्याच आयुष्य सुखाच व्हाव, म्हणून त्याच्या भावनेसाठी निर्माण झाला

२८-८-६५
२६३०
क्रमांक ९२१९१५०
नों. दि.
वाचनालय

आहे. श्रीपती तू तुझ्या भावाला कायद्याच्या कठोर दोरीत आवळला असलास, तरीही द्यावीस जमीन--

श्रीपत--दिली ! दिली महाराज !

तुणतुणेवाला--शाबास श्रीपत !

ढोलकवाला--शाबास गणपत !--

प्रधान--जय देवी भारती ! भारती देवीचा जयजयकार असो !

भारती--जा प्रधानजी विनू संन्याशासारख रत्न तुम्ही शोधून आणल. धन्यवाद ! माझा संदेश चोहोकडे पोहोचवण्यात त्याना मदत द्या--

प्रधान--आज्ञा देवी--

तरुण सं०--देवी आपली आज्ञा घेऊन मी निघालोच. चला महाराज--

ऐका ऐका प्रजाजन
तुम्हाला भारतीची आण
ज्याना जमीन देण्याइतुकी
द्या थोडी त्यातुन
तुम्हाला भारतीची आण
करावे दीनासाठी भूदान
जमीन सगळ्याची आई
ती मुळीच जयाना नाही

त्याची करा काळजी काही
आपणासोबत जगवू याहो
इतरांचेही प्राण

तुम्हाला भारतीची आण
करावे दीनासाठी भूदान

[ हेच गाणे पुन्हा पुन्हा म्हणत सारेजण निघून जातात. पडद्या मागे गेल्यावर सुद्धा गाणे ऐकू येत रहाते. मग पडदा पडतो. ]

BVBK-0404570